# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५**

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ८

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडजी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण.**<br>**रूपये:- ४४,८०,४४,०५,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१) | ५०५ | १० | राज्यातील ओबीसी वसतिगृहातील ओबीसी, व्हिजेएनटी, व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी यांना मागील चार महिन्यापासून प्रत्येकी चार हजार आठशे रुपये निर्वाह भत्ता मिळालेला नसल्याने या विद्यार्थ्यांवर उपासमारीची पाळी येणे, राज्यातील अनेक जिल्ह्यात ओबीसी, व्हीजेएनटी मुलींसाठी व मुलांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र वसतिगृह खाजगी भाड्याच्या इमारतीमध्ये सुरु करणे, या इमारतीमध्ये मेस उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना बाहेर जेवणासाठी जावे लागत असल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्यात पसरत असलेला तीव्र असंतोष, परिणामी विद्यार्थ्यांना थकीत असलेला निर्वाह भत्ता व यापुढे रेगुलर निर्वाह भत्ता मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५११ | १० | राज्यातील ओबीसी, व्हिजेएनटी, व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी व मुलांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे दोन वसतिगृह मंजूर करणे, या वसतिगृहासाठी तातडीने इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असताना सुध्दा याकडे शासनाचे होत असलेलले अक्षम्य दुर्लक्ष, या वसतिगृहाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नसणे, यासाठी शासकीय जागा उपलब्ध नसणे, त्यामुळे खाजगी इमारतींमध्ये शासकीय वसतिगृह सुरु करण्यात येत असल्याने यामध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्यामुळे नवीन शासकीय वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्याची मागणी विद्यार्थी यांच्यासह पालकांनी करून सुध्दा याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी राज्यातील सर्व जिल्ह्यात ओबीसी, व्ही.जे.एन.टी. व विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५१६ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील करंजी येथील ग्रामपंचायतिने विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थीची यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजणेसाठी ग्रामसभेतुन ४९८+नावे मंजूर करून पंचायत समिती गोंडपिपरी कडे पाठविले असता पंचायत समितीने ३५८ लाभार्थी यांची निवड करून त्यांच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नावे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजने अंतर्गत घरकुल मंजूर करण्यासाठी सचिव इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे पाठविण्यात येणे, मात्र अंतिम मंजुरी विना सदर प्रस्ताव संबंधित विभागाकडे प्रलंबित असल्याने त्यांच्यात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी सदर प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ४५४ | १० | गोंदिया जिल्ह्यात २०२३-२४ या सत्रापासून इतर मागासवर्गीय वर्गातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळण्यासाठी प्रधान मंत्री आवास योजना सुरू करण्यात आली असणे, जिल्हयात २०२३-२६ च्या तीन वर्षात लाभार्थ्यांना घरकुल देण्याचे उद्दिष्ट असताना गोरगरीबांच्या घरकुलाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास येणे, जिल्हयातील ओबीसी तसेच मागास संवर्गातील लाखोच्या संख्येने घरकुलाच्या याद्या धूळ खात पडलेल्या असणे तसेच ओबीसी लाभार्थ्यांचे लाखोंच्या संख्येने घरकुलाचे प्रस्ताव रखडल्यामुळे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षा पासून इतर मागास संवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळण्या पासून दुरापास्त रहावे लागणे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत योजनेची जलद गतीने प्रक्रिया करीत सर्वच घरकुलांना मंजूरी देण्यात येऊन घरकुलांच्या कामाला सुरुवात झाली असताना शासनाकडून निधी मिळाला नसल्याने प्रधानमंत्री घरकुल योजनेला स्थगती दिल्याने लाभार्थ्यामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ ठोस निर्णय घेऊन, ओबीसी गरजू गरीब इतर मागास वर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाना मंजूरी देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५२८ | १० | राज्यातील इतर मागास प्रवर्ग, भटक्या जमाती तसेच विशेष मागासवर्गाच्या विद्यार्थ्यासाठी शासनाने ५२ नवीन शासकीय वसतीगृहे सुरु केली असणे, सदरच्या वसतिगृहात ३००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असणे, तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांना शासनाकडून मासिक निर्वाह भत्ता व भोजन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, शैक्षणिक साहित्यासाठी दरमहा अनुदान देण्याचा निर्णय घेतला असणे, विद्यार्थ्यांना अद्याप कोणत्याच भत्त्याचे अनुदान मिळाले नसणे, त्याच प्रमाणे शैक्षणिक साहित्यांचेही अनुदान मिळाले नसणे, गृहपाल, लिपिक, शिपाई व इतर कर्मचा-यांना गत ८ महिन्यापासून वेतन अदा झाले नसणे, भत्त्या अभावी कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असणे, विद्यार्थ्यावर उपासमारीची पाळी येत असणे, सर्व बाबींना तातडीने अनुदान देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष परिणामी विद्यार्थी पालक व स्थानिक नागरिकांत निर्माण झालेली तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | ५३१ | १० | हिमायतनगर, जि. नांदेड तालुक्यातील मागासवर्गीय प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेतील घरकुले निधी अभावी प्रलंबित असणे, ९०० मागासवर्गीय लाभधारकांना केवळ पहिला हप्ता म्हणून रु.१५,०००/- अनुदान वितरीत केले असणे, पुढील हप्ते तातडीने देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मोदी आवास घरकुल योजनेतंर्गत सन २०२३-२४ करिता ३ लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित केले असणे, अद्याप उद्दिष्ट पूर्ण झाले नसणे, लाभार्थ्यांना तातडीने हप्ते देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ५३२ | १० | पालम तालुक्यातील, जि. परभणी इतर मागासवर्गीयासाठी मोदी घरकुल योजना कार्यान्वित केली असणे, पालम तालुक्यातील इतर मागासवर्गीयांना रु. १५,०००/- अनुदान मिळाले असणे, मात्र उर्वरित अनुदान अद्याप लाभार्थींना मिळाले नसणे, उर्वरित अनुदान तातडीने देण्याची गरज निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५३३ | १० | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना राज्यात राबविली जात असणे, परभणी व सोलापूर जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांना मंजूर घरकुलांचे लाभ व इतर निधी देण्याची आवश्यकता असणे, शासनाकडे प्रस्ताव सादर करुन ही निधी मंजूर झाल नसणे, परभणी जिल्हयातील रु.८,६१७/- मंजूरी देण्यात आली मात्र निधी मिळाला नसणे, सदरची योजना पालम तालुक्यात राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई